दिनांक : १०/०२/२०१७ रोजी मुंबई चौफेर या पेपरमध्ये आलेली बातमी


# मुंबई चौफेर


## कॉलेज अपडेट

डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज्, ठाणे म्हणजेच ब्रिम्स (BRIMS) ने आपल्या PGDM अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी १८ ते २४ जानेवारी २०१७ दरम्यान सिंगापूर येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते. या संधीचा पुरेपूर उपयोग करून अशा सहलीचा एक आजीवन अनुभव घ्यावा यासाठी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. पाचही दिवसात हेच निदर्शनास आलं, सिंगापूर खरोखर एक सुंदर, आकर्षक आणि इतर देशापेक्षा वेगळा देश आहे. कमालीच्या विकसित देशांपैकी एक आहे. प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी त्या देशाला भेट दिली पाहिजे- असे तेजल ठक्करने (PGDM ची विद्यार्थिनी) सांगितले. सिंगापूरची प्रगती आणि सिंगापूरचे व्यावसायिक धोरण की, ज्यामुळे ते एक विकसित राष्ट्र बनले त्याबद्दल आपले अनुभव तिने व्यक्त केले. सहलीच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी सिंगापूर नॅशनल लायब्ररीला भेट दिली, जुन्या ग्रंथालयातील सर्व प्रमुख कारभार या नॅशनल लायब्ररी बोर्डच्या प्रमुख इमारतींत एकत्र आणून आता हे ग्रंथालय 'ली कॉंग चैन संदर्भ ग्रंथालय' म्हणून ओळखले जाते. हे मी आतापर्यंत पाहिलेल्या ग्रंथालयांपैकी सर्वोत्तम ग्रंथालय आहे. तेथे खरोखरच चांगला संग्रह होता. सिंगापूरमध्ये राहणाऱ्या वाचकांसाठी तर हे ग्रंथालय म्हणजे ज्ञानाचा खजिना आहे. ज्या प्रकारे या संपूर्ण ग्रंथालयाची व्यवस्था नियोजित केली आहे. ते पाहून खूपच कौतुक वाटले- राहुल राव या PGDM च्या विद्यार्थ्याने दिलेला अभिप्राय. या संपूर्ण ग्रंथालयाला भेट देताना डॉ. आगरकर सरांसारखे उत्तम मार्गदर्शक लाभले म्हणून सर्वच विद्यार्थ्यांनी त्यांचे आभार मानले.



शुक्रवारी २० जानेवारीला सकाळी सर्व विद्यार्थी Singapore Maritime Trails वर जाण्यासाठी उत्सुक होते. सागरी मार्ग सफर ही प्रसिद्धीसाठीची संकल्पना असून, सिंगापूर Maritime and Port Authority तर्फे त्याचे आयोजन केले जाते. Singapore Maritime Trails ही सिंगापूरच्या ऐतिहासिक कारकिर्दीपासून सुरू होऊन आजच्या सिंगापूर, एक प्रतिथयश सागरी मार्ग व्यापार आणि इतर उपक्रमांचे केंद्र म्हणून प्रस्थापित होईपर्यंतच्या कालावधीची सफर आहे. ही सफर सिंगापूर नदीच्या उगमापासून सुरू होऊन पुढे पश्चिमेला वळून पुढे Telok Ayer क्षेत्र आणि नंतर केप्पल बंदरावरील नवीन बंदरावर संपते.

ही सफर म्हणजे २.५ तासांची एक मनोहारी, अतिरम्य निसर्ग सौंदर्याने नटलेली अशी होती. एकजुटीने इतिहास जपणारी माणसे येथे प्रकर्षाने दिसलीत असा अभिप्राय उन्नती ब्रह्मे या PGDM च्या विद्यार्थिनीने दिला.

२१ जानेवारीला विद्यार्थ्यांनी जगातील सर्वोच्च तंत्रज्ञान वापरून तयार केलेल्या जल शुद्धीकरण प्रकल्पाला भेट दिली. या प्रकल्पामध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी पेयजलामध्ये रूपांतरित करण्याची क्षमता आहे. सिंगापूरमध्ये 'पाणी' मलेशियामधून आयात केले जाते. त्यामुळे तेथे पाण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. २२ जानेवारीला विद्यार्थ्यांनी सेंटोसा आयलंडचा आनंद लुटला. सेंटोसा आयलंड म्हणजे एका ५०० एकर नापीक जमिनीचे आश्चर्यकारक करमणूक उद्यानात केलेले रूपांतर आहे. सोनेरी वालुकामय किनारे आणि अनेक रोमांचकारी आकर्षणांची शृंखला असलेल्या रिसॉर्ट्सचे हे एक बेट आहे. येथील सर्वात महत्त्वाचे आकर्षण असलेला, पुरस्कारप्राप्त Wings of Time हा लेसर शो पाहून या दिवसाच्या कार्यक्रमाची सांगता मनोहारी झाली. २३ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांनी एक सार्वजनिकरीत्या अनुदानीत अशा Singapore Management University या स्वायत्त विद्यापीठाला भेट दिली. येथे विशेषतः व्यवसाय आणि व्यवस्थापन या विषयाचा अभ्यास केला जातो. रटव हे विद्यापीठ आशियातील सर्वोच्च विद्यापीठांमध्ये गणले जाते. येथील कलात्मक तंत्रज्ञान आणि उत्कृष्ट पायाभूत सुविधा यामुळे अध्ययनासाठी हे एक उत्तम स्थळ आहे, असे PGDM समन्वयक दिप्ती पेरीवाल यांनी सांगितले. येथील International Trading Institute चे संचालक ख्रिस यांच्याशीही विद्यार्थ्यांनी संवाद साधला. यादरम्यान त्यांनी सिंगापूरची प्रगती आणि चीनसारख्या प्रतिस्पर्धी राष्ट्राशी तुलनासंदर्भात काही ठळक मुद्दे मांडले. एखाद्या विद्यापीठ अंतर्गत स्थापन झालेली अशी ही जगातील पहिली व्यापार संस्था आहे.

शुभम पेडामकर